नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 08/06/2020 (सोमवार)
(दुपार)

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत मौजा पो. स्टे. भिवापुर टि पॉईन्ट राज्य मार्ग क्र. 09 येथे दिनांक 07/06/2020 चे 01:00 वा. दरम्यान भिवापुर पोलीस पथक पो. स्टे. परिसरात पेट्रोलींग करीत असतांना मुखबिर द्वारे माहिती मिळाली की, काही इसम नागभिड कडून एमएच–40/वाय–3187 क्रमांकाच्या एक टाटा सुपर एक्स वाहनचा चालक हा त्याच्या ताब्यातील वाहनाचे डाल्यामध्ये जनावरे भरून नागपूर ला भिवापूर मार्गे वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन भिवापुर पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एमएच–40/वाय–3187 क्रमांकाच्या एक टाटा सुपर एक्स गाडीला थांबविले. सदर वाहन तपासले असता त्यामध्ये आरोपी क्र. 1) शेख इरफान शेख गफार, वय 36 वर्ष, रा. गिटटीखदान झोपडी नागपूर, 2) छोटू रसिद शेख, वय 30 वर्ष, रा. बैलबाजार धर्मापूर भिवापूर यांच्या ताब्यातुन एकुण 11 (गाई,गोरे) कि. 1,10,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळून आले. आरोपींच्या ताब्यातून वाहनासह एकुण किंमती 7,10,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे अनिल कोकोडे, पो.स्टे. भिवापुर यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापुर येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11(1) (ड) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ) 9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा, सहकलम 83/177 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक रविन्द्र फरकाडे 7972328971हे करीत आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर